RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MH/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ४९] गुरुवार, नोव्हेंबर ३, २०११/कार्तिक १२, शके १९३३ [पृष्ठे ४
किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ८९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ नोव्हेंबर २०११

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मवैअ-२०११/प्र.क्र.७७/सेवा-३ (नि.मं.).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २००० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०११ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २००० (यात यापुढे ज्यांचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) च्या नियम ३ मधील उपनियम (क) च्या ऐवजी खालील उपनियम अंतर्भूत करण्यात यावा :—

"(क) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करता येईल,—

(एक) ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नाही :



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

परंतु, अगोदरपासून शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील अर्हता धारण केली आहे,—

(अ) सांविधिक विद्यापीठाची बालरोगचिकित्सा किंवा शल्यचिकित्सा किंवा औषधवैद्यक किंवा स्त्रीरोग चिकित्सा किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृतीशास्त्र किंवा नेत्रशल्य चिकित्सा किंवा अस्थिव्यंगोपचार किंवा कान-नाक-घसा शल्य चिकित्सा किंवा क्ष-किरणशास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा उरो रोग किंवा चर्मरोगचिकित्सा शास्त्र यापैकी कोणत्याही विशेषज्ञ शाखेतील किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या अन्य विशेषज्ञ शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी ; किंवा

(ब) सांविधिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ (१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता ; किंवा

(क) महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र २७) ला जोडलेल्या भाग (अ-१) अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली शुद्ध आयुर्वेदमधील पदवी किंवा बी.ए.एम.एस. पदवी :

परंतु आणखी असे की, वरील उपखंड (अ) मधील विशेषज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेषज्ञ शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, शासन, निवड मंडळाच्या शिफारशीनुसार कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत शिथिल करू शकेल :

परंतु आणखी असे की, वरील उपखंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती नियम ५ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शुद्ध आयुर्वेद पदवी धारकांसाठी आरक्षित केलेल्या पदावर करण्यात येईल ".

३. मुख्य नियमाच्या नियम ४ खाली पुढील परंतुक अंतर्भूत करण्यात यावे :—

" परंतु असे की, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवेच्या आवश्यकतेनुसार आणि गरजेनुसार त्या विनिर्दिष्ट वर्षामध्ये पदव्युत्तर पदवी किंवा पदविका धारक उमेदवारांमधून भरावयाची एकूण पदे शासन निश्चित करून जाहीर करेल ".

४. मुख्य नियमाच्या नियम ५ मधील " खंड (क)(दोन)(ब) " या शब्द, कंस व अक्षर ऐवजी " खंड (क) च्या उपखंड (दोन) (क)" हे शब्द, कंस व अक्षर अंतर्भूत करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. रा. वेदपाठक,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 2nd November 2011

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MMO-2011/C.R. 77/Seva-3 (N.M.).—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, further to amend the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) Rules, 2000, as follows, namely :—

1. These rules may be called the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) (Amendment) Rules, 2011.

2. In rule 3 of the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) Rules, 2000 (hereinafter referred to as " the principal Rules "), for sub-rule (c), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(*C*) by nomination from amongst the candidates who,—

(*i*) are not more than thirty five years of age :

Provided that, the upper age limit may be relaxed by the Government maximum upto five years in case of the candidates who are already in the Government service ; and

(*ii*) possess,—

(*a*) the post Graduate Diploma or Degree of a Statutory University in Paediatrics or General Surgery or General Medicine or Gynaecology or Anesthesiology or Psychiatry or Ophthalmology or Orthopedics or E.N.T. or Radiology or Pathology or Chest and TB Physician or Dermatology or in any other Speciality as specified in the First or Second Schedule appended to the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956) ; or

(*b*) the MBBS Degree of a statutory University or any other qualification as specified in the First or Second Schedule appended to the Indian Medical Council Act, 1956 (102 of 1956) ; or

(*c*) the Degree in *Shuddha Ayurved* as specified in part (A1) of the Schedule appended to the Maharashtra Medical Practitioners Act, 1961 (Mah. XXVII of 1961) or BAMS Degree :

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

Provided that, the upper age limit may be relaxed by the Government maximum upto 10 years on the recommendation of the Selection Board in favour of the candidates having exceptional or super-speciality qualifications in the faculties specified in sub-clause (*a*) above :

Provided further that, the candidates possessing qualifications specified in sub-clause (*c*) above, shall be held eligible for appointment only to the posts reserved for graduates in *Shuddha Ayurved* as per the provisions made in rule 5 ".

3. To Rule 4 of the principal Rules, the following proviso shall be added, namely :—

" Provided that, the Government shall identify and declare the total number of posts to be filled in that particular year from amongst the persons holding the post graduate degree or diploma as per the need and requirement of the Maharashtra Medical and Health Services."

4. In rule 5 of the principal Rules, for the words, brackets and letter " sub-clause (*ii*) (*b*) " the words, brackets and letter " sub-clause (*ii*) (*c*) " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. R. VEDPATHAK,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21 A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21 A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner